**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२४ – २५

## NSS – जागतिक एड्स दिन

प्रचंड खपाचे एकमेव नि:पक्ष व निर्भीड दैनिक
पुढारी
स्थापना १९३९
www.pudhari.com

### राजगुरुनगर येथे जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती

**वाफगाव : पुढारी वृत्तसेवा**

जागतिक एड्स दिनानिमित्त (दि.२ डिसेंबर) राजगुरुनगर येथील हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रेड रिबन क्लब व चांडोली ग्रामीण रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने जनजागृती कार्यक्रमाचे आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमाचा उद्देश एड्स प्रतिबंध, तंबाखूच्या धोक्यांविषयी व आरोग्यविषयक जनजागृती करणे होता.

या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून चांडोली ग्रामीण रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. तेजश्री रानडे उपस्थित होत्या. त्यांनी एड्स जागरूकतेचे महत्त्व, चाचणी करण्याचे फायदे आणि एड्सशी संबंधित गैरसमज दूर करण्याची गरज यावर माहिती दिली. डॉ. सारिका खाडे यांनी तंबाखूमुळे होणाऱ्या कर्करोगाचे धोके आणि त्याची लक्षणे याविषयी मार्गदर्शन केले. या प्रसंगी चांडोली ग्रामीण रुग्णालयातील समुपदेशक मुख्तार शेख यांनी रेड रिबन क्लबचे उद्दिष्ट आणि त्याच्या उपक्रमांची माहिती दिली.



**जागतिक एड्स दिनानिमित्त जनजागृती कार्यक्रमाचे उद्घाटन करताना मान्यवर.**

या वेळी एड्स जनजागृतीवर आधारित पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. तसेच विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर केले. प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्रयोगशाळा तंत्रज्ञ अल्ताफ पठाण, समुपदेशक योगेश बोरडकर, शंकर जाधव या वेळी उपस्थित होते. सूत्रसंचालन साक्षी मुळुक हिने केले, तर श्वेता धवसे हिने आभार मानले.

My Gramin Edition
Dec 06, 2024 Page No. 10
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख